दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १४३ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.२२ फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# अहो पोटी जन्माला येण्यापेक्षा ज्यांनी बोटाला धरून चालवलं, त्यांच्यासोबत निष्ठेने वागणं महत्त्वाचे-खासदार अमोल कोल्हे

**पुणे**–पोटी जन्माला येण्यापेक्षा ज्याने बोटाला धरून चालवलं, त्याच्या सोबत चालणं गरजेचं असतं, असे म्हणत खासदार अमोल कोल्हे यांनी अजित पवार यांना टोला लगावला. एकेकाळी शरद पवारांचे अत्यंत विश्वासूपैकी एक असलेले मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या मतदारसंघात शरद पवार यांची सभा पार पडली आहे. याच सभेत खासदार अमोल कोल्हे यांनी अजित पवारांचा चांगलाच समाचार घेतला.

खासदार अमोल कोल्हे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यासाठी ज्यांनी बलिदान दिले. अनेक वार छाताडावर झेलले, त्यातील प्रत्येकजण छत्रपतींच्या पोटी जन्माला आले नव्हते. त्यामुळे अनेकांना वाटतं की पोटी जन्माला येणं गरजेचं आहे. अहो पोटी जन्माला येण्यापेक्षा निष्ठेने वागणं खूप महत्त्वाचं आहे. त्यामुळं पोटी जन्माला येण्यापेक्षा ज्याने बोटाला धरून चालवलं, त्याच्या सोबत चालणं अत्यंत गरजेचे आहे.कोल्हे म्हणाले की, २०१९ मध्येही शिरूर लोकसभेत शरद पवार साहेबांना आव्हान देण्यात आलं. त्यावेळी मी इथून खासदार झालो. आताही शिरूर लोकसभेसाठी शरद पवारांना आव्हान देण्यात आलेले आहे. यावेळी सुद्धा आंबेगावची जनता पुन्हा तोच विश्वास दाखवणार यात शंका नाही, असे कोल्हे म्हणाले. दिल्लीतून गुबूगुबू म्हटल्यावर माना डोलवणारे खासदार निवडून द्यायचे की तुमच्या हक्काच्या प्रश्नांसाठी लढा उभारणारे वाघ खासदार म्हणून निवडून द्यायचे हे तुम्ही ठरवा, असेही ते म्हणाले.रद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीही अजित गटावर जोरदार हल्लाबोल केला. ते म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेल्या फुटीबाबत लय विषय उघडला, तर सगळं टोकाला जाईल. मुळात आपला पक्ष म्हणजे शरद पवार साहेब आहेत. त्यामुळं तर दिल्ली सुद्धा या नावाला घाबरून असते.त्यांचे डाव आम्ही पाहिले आहेत. ते काय करतील हे कोणीच सांगू शकत नाही. मध्ये कोणीतरी तेल लावून पैलवान तयार होता, त्यांची काय अवस्था केली हे उभ्या महाराष्ट्राने पाहिलं. वस्ताद एक डाव मागे ठेवतात, त्यामुळं पवार साहेबांनी शेवटचा एक डाव मागे ठेवला आहे, जो त्या सर्वांना चितपट करेल यात शंका नाही, असा टोला जयंत पाटील यांनी लगावला.दरम्यान, दिलीप वळसेंची पोलखोल करण्यासाठी देवदत्त निक यांनी लाव रे तो व्हिडीओचा फॉर्म्युला अवलंबला. पवार साहेब सांगतील वळसे हे मानसपुत्र की आणखी कोण? असे देवदत्त निकम म्हणाले. देवदत्त निकम याच मतदारसंघातून शरद पवार गटाकडून इच्छूक आहेत. पवार साहेब तुम्ही आमच्या हद्दीत आले की दिलीप वळसे पाटील तुम्हाला चिकटतात. तुमच्या बाजूला बसून गप्पा मारतात, ते फोटो सोशल मीडियावर पोस्ट करतात आणि सर्वांना दाखवतात साहेबांसोबत आमचं अजून ही सख्य आहे, असा टोलाही त्यांनी लगावला.





# गोंडपिपरी तालुक्यातील विविध पक्षाच्या कार्यकर्त्यांचा काँग्रेस प्रवेश

## आमदार सुभाष धोटें यांच्या हस्ते पक्षप्रवेश

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**



गोंडपिपरी तालुक्यातील विविध पक्षात काम करणार्या कार्यकर्त्यांनी राजुरा क्षेत्राचे आमदार सुभाष धोटे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून राजुरा येथील जनसंपर्क कार्यालयात आ.धोटे यांच्या हस्ते काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

पक्षप्रवेश करणाऱ्यांच्या यादीत सुरेखा ऋषी मडावी,निर्मला मडावी,विमल महादेव शेडमाके,उषा प्रभाकर आलाम,उषा संतोष मडावी,अलका पांडुरंग मडावी,ललिता रवींद्र परचाके,आशा महादेव आत्राम,बाली मडावी,मिराबाई सिडाम,अलका आत्राम,रत्नमाला कुळसंगे,रवींद्र परचाके,चैत्राम मडावी,परशुराम कुळमेथे,अक्षय मेश्राम,सागर आत्राम,प्रदीप गेडाम,श्रीकांत मडावी,खुशाल कातलाम,गोपाल कुलमेथे,श्रीकांत ऊरवेते,चंद्रकांत गेडाम,संदीप बंडु मडावी इत्यादी महिला व पुरुष कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.सर्वांना काँग्रेस पक्षाचे दुपट्टे देऊन आ.धोटे यांनी पक्ष प्रवेश दिला.यावेळी गोंडपिपरीच्या नगराध्यक्ष सविता कुळमेथे,काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनिल झाडे,काँग्रेसच्या अनुसूचित जमाती विभागाचे तालुका अध्यक्ष बबलु कुळमेथे यासह अनेक पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते.

## चंद्रपूर भाजपा महिला मोर्चा जिल्हा कार्यकारिणी जाहीर

# भाजपा महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा वंदना शेंडे यांनी केली घोषणा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भाजपा महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा वंदना शेंडे यांनी नवनियुक्त चंद्रपूर जिल्हा भाजपा महिला मोर्चा कार्यकारिणीची नावे जाहीर केली आहे. यामध्ये सरचिटणीस, उपाध्यक्ष, सचिव, सदस्य यांचा समावेश आहे.

भाजपा जिल्हा महिला मोर्चा ग्रामीणच्या सरचिटणीसपदी विजयाताई डोहे, नीलम सुरमवार, लक्ष्मी सागर, प्रिया लांबट हे असतील. सुलभा पीपरे, वैशाली बुद्धलवार, शोभा पिदुरकर, मंजरी रांजनकर, मीनाक्षी दलाल, संध्या मिश्रा,गिता लिंगायत, मंदा कश्यप, सुरेखा कोंडावार, रोहिनी देवतळे, स्वरूपा झवर, वर्षा लांडगे यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. लक्ष्मी सहारे, प्रतिभा बोबाटे, सरला नवले, अरुणा चौधरी, ज्योती बुरांडे, संजीवनी वाघरे, भारती धोंडे, वीणा मुद्दलवार, माया वाघाडे, सूनंदा माणूसमारे, किर्ती कातोरे, ममता बोज्जा,सुरेखा पाटील हे सचिव असतील. जिल्हा कार्यकारणीत सदस्यपदी शितल राकडे, माधुरी भेंदरे, मनीषा कावळे, जया जोनमवार, पुष्पा शेरकी, मीना नन्नावरे, सुनीता मॅकलवार, प्रियंका नर्मलवार, गीता बोरकर, प्रिती रेक्कलवार, तानाबाई मडावी, विजया चव्हाण, तेजस्विनी भगत, सपना तामगाडगे, शकुंतला कोसले, तेजस्विनी झाडे, सुजाताताई दुर्गपुरोहित, वैशाली डाखरे, शिलाताई आत्राम, सुलभा भोंगळे, इंदुताई आंबोरकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे महाराष्ट्राचे वन व सांस्कृतिक कार्य तथा मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, केंद्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय गृहराज्य मंत्री हंसराज अहीर, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, आमदार कीर्तीकुमार भांगडीया, आमदार रामदास आंबटकर, भाजपाचे ज्येष्ठ नेते चंदनसिंहजी चंदेल,माजी आमदार प्रा. अतुल देशकर, ॲड.संजय धोटे,माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे,भाजयुमो जिल्हाध्यक्ष महेश देवकते ,प्रदेश महिला मोर्चा सरचिटणीस अल्काताई आत्राम, विद्या देवाडकर प्रदेश भाजपा चिटणीस , माजी आमदार जैनुद्दीन जव्हेरी, सुदर्शन निमकर, भाजपा नेते अशोक जीवतोड,भाजपा ज्येष्ठ नेते विजय राऊत, प्रमोद कडू, खुशाल बोंडे, राजेंद्र गांधी, रमेश राजूरकर, संजय गजपुरे, नामदेव डाहुले, अनिल डोंगरे, आशिष देवतळे , वंदना शेंडे, गौतम निमगडे, डॉ अंकुश आगलावे, अरुण मडावी, बंडू गौरकार,इमरान पठाण आदींनी अभिनंदन केले आहे.

# भाजयुमो जिल्हाध्यक्ष महेश देवकते यांनी केली घोषणा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष महेश देवकते यांनी नवनियुक्त चंद्रपूर जिल्हा भारतीय जनता युवा मोर्चा कार्यकारिणीची नावे जाहीर केली आहे. यामध्ये सरचिटणीस, उपाध्यक्ष, सचिव,सदस्य, संयोजक, सहसंयोजक यांचा समावेश आहे.

भारतीय जनता युवा मोर्चा ग्रामीणच्या सरचिटणीसपदी श्रीनिवास जंगम, अमित गुंडावार, तनय देशकर, यश बांगडे, प्रफुल कोलते हे असतील. ओम पवार, आशिष ताजने, महेश श्रीरंग, रोहन काकडे, मोहित डंगोरे, आशिष माशिरकर, मोहन चलाख, राहुल सूर्यवंशी, पुंडलिक गिरमाजी, लिलाराम राऊत, योगेश नाकाडे, नरेंद्र खोब्रागडे, रवी गायकवाड,विशाल शर्मा, प्रवीण बरडे यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राहुल बिसेन, पुनेश गांडलेवार, वैभव पिंपळ शेंडे, दिनेश कोमरवेल्लीवार,छबरलाल नाईक, रमेश पुल्लीपाका, शिवाजी चांदेकर, रूपेश मांढरे, संतोष जाधव, सूरज किनेकार, अशोक पटेल, संकेत सोनवाणे, दिनेश समर्थ,बबलू गुप्ता,रामनरेश गुप्ता हे सचिव असतील.सदस्यपदी नागेश कडुकर, रितीक सायनकर, पंकज चीलनकर, पीयूष मेश्राम, शुभम समर्थ, श्रीकांत कुचनवार, सचिन गुरुनुले, बबलू खड़का,सूरज बुरांडे, आशिष मामीडपल्लीवार, अजय तिखट यांची नियुक्ती करण्यात आली आहे. युवा वॉरीयर्स प्रमुखपदाची जबाबदारी संयोजक म्हणून सोहम बुटले यांना देण्यात आली आहे. युवती विभागात मोनिका टिपले या संयोजिका असतील. विद्यार्थी विभागाचे सौरभ मेनकुदळे संयोजक असतील. सोशल मीडिया विभागात नंदकिशोर बगुलकर हे जिल्हा संयोजक असतील चेतन पाल, राहुल धुर्वे, राहुल कावळे, रोहन चालेकर, राहुल बांदूरकर यांना सहसंयोजक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे महाराष्ट्राचे वन व सांस्कृतिक कार्य तथा मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, केंद्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय गृहराज्य मंत्री हंसराज अहीर, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, आमदार कीर्तीकुमार भांगडीया, आमदार रामदास आंबटकर, भाजपाचे ज्येष्ठ नेते चंदनसिंहजी चंदेल,माजी आमदार प्रा. अतुल देशकर, ॲड.संजय धोटे, माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, विद्या देवाडकर प्रदेश भाजपा चिटणीस , प्रदेश महिला मोर्चा सरचिटणीस अल्काताई आत्राम,माजी आमदार जैनुद्दीन जव्हेरी, सुदर्शन निमकर, भाजपा नेते अशोक जीवतोड,भाजपा ज्येष्ठ नेते विजय राऊत, प्रमोद कडू, खुशाल बोंडे, राजेंद्र गांधी, रमेश राजूरकर, संजय गजपुरे, नामदेव डाहुले, अनिल डोंगरे, आशिष देवतळे ,महेश देवकाते, वंदना शेंडे, गौतम निमगडे, डॉ अंकुश आगलावे, अरुण मडावी, बंडू गौरकार,इमरान पठाण आदींनी अभिनंदन केले आहे.

# विकास नीधी वाटपात राजकीय हस्तक्षेप झालाय का ? उच्च न्यायालयाची विचारणा

## जिल्हा परिषदेला उत्तर दाखल करण्याचे आदेश शंकरपूरचे सरपंच साईश वारजुकर यांची याचिका

**चिमूर । शेषराव राऊत**

महाराष्ट्रात राजकीय सत्ता बदल झाला की विरोधकांच्या मतदारसंघातील निधी दुसरीकडे वळवणे किवा विरोधी सत्ता असलेल्या मतदार संघातील विकास कामाना स्थगिती देणे हा प्रकार नवा नाही मात्र आता ग्रामपंचायतीना विकासकामासाठी जिल्हा परिषदेचे माध्यमातून मिळणारा निधी सुद्धा राजकीय हस्तक्षेप करून रोखण्यात येत आहे. त्यामुळे विरोधी पक्षाची सत्ता असणाऱ्या ग्रामपंचायतीना त्यांच्या पाठपुराव्यानंतरही मुद्दामहून निधी मिळण्यापासून वंचित केले जात आहे. आणी ज्या ग्रामपंचायतीना गुणवत्तेच्या आधारावर निधी मिळू शकत नाही तसेच ज्या ग्रामपंचायती कायद्याचे निकष पूर्ण करू शकत नाही अशा ग्रामपंचायतीना केवळ पालकमंत्र्याच्या शिफारसीवर निधी उपलब्ध करून दिला जात आहे. त्यामुळे हा राजकीय हस्तक्षेप थांबवून जिल्हा परिषदेला नव्याने निधी वितरण करण्याचे आदेश द्यावे, अशी याचिका चिमूर तालुक्यातील शंकरपुर ग्रामपंचायतीचे सरपंच साईश वारजुकर यांनी त्यांचे अधिवक्ता भूपेश् वामनराव पाटील यांचे मार्फत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल केलेली आहे.

नागरी विकास कामाकरिता ज्या ग्रामपंचायतिची लोकसंख्या तीन हजारपेक्षा जास्त आहे अशा ग्रामपचायतीमधे विविध् विकासकामे पूर्ण करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीचे माध्यमातून जिल्हापरिषद चंद्रपूर ला ६७८ लक्ष रुपयाचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. जिल्हा परिषदेला जे प्रस्ताव विविध ग्रामपंचायतीनी पाठवले त्या प्रस्ताव यादीत शंकरपूर ग्रामपंचायतीला २० लक्ष रुपये निधी देण्याबाबत नमूद केले आहे व् हे अनुदान् शंकरपूर ग्रामपंचायतीला प्राप्त होऊन यातून गावातील विकासाकामे होतील अशी ग्रामवासियाची अपेक्षा असतानाच व सदर यादी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना मंजुरीसाठी पाठवल्यानंतर अचानक सर्व कायदे धाब्यावर् बसवुन् सत्ताधारी राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी हा नीधी त्यांचे ग्रामपंचायतीला द्यावा, म्हणून प्रशासनावर दबाव आणला व त्याचे आधारे मूळ प्रस्ताव यादीसोबत राजकीय शिफारसीचे आधारावर पुरवणी यादी तैयार करण्यात आली व मूळ यादीतील ग्रामपंचायतीचे नाव गाळून सत्ताधारी पक्षानी शिफारस केलेल्या ग्रामपंचायतीना हा निधी वितरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लहान सहान विकासकामातही जर राजकिय हस्तक्षेप होणार असेल तर ग्रामपंचायतीनी विकासाकामे कशी करायची ? हा स्थानिक संस्थां चे अधिकारावर अतिक्रमणाचा प्रकार आहे असा आरोप याचिकेत केला गेला आहे सदरची संविधानीक याचिका नागपूर उच्च न्यायालयाच्या खंडपिठाचे मुख्य प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे व अभय मंत्री यांचे युगलपीठापुढे सुनावणी करिता दिनांक १६ फेब्रूवारी २०२४ रोजी आली असता याचिकाकर्त्याचे वकील भूपेश पाटील यांनी उपस्थित केलेले मुद्दे लक्षात घेता विकास कामांचा नीधी वितरीत करताना पालकमंत्र्याच्या हस्तक्षेपावरून यादी तैयार केली आहे का ? या बाबत चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढील तारखेपर्यंत आपले शपथपत्र दाखल करावे असे आदेश उच्च न्यायालयाने दिलेले आहेत व या सोबतच राज्य सरकारच्या ग्रामाविकास मंत्रालयाला तसेच जिल्हाधिकारी चंद्रपूर याना कारणे दाखवा नोटिस् बजावलेले आहेत . उच्च न्यायालयात याचिकाकर्ते यांचे वतीने उच्चं न्यायालयाचे अधिवक्ता भूपेश वामनराव पाटील तर राज्य सरकारचे तसेच जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे वतिने सरकारी अधिवक्ता माडीवाले यांनी बाजू मांडली.

# आनंदवनातील आनंद माध्यमिक विद्यालयात शिवजयंती साजरी

**वरोरा । प्रतिनिधी**



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५व्या जयंतीनिमित्त आनंदवनातील आनंद माध्यमिक विद्यालयात १९ फेब्रुवारी ला शिवजयंतीनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आनंद माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विद्या गोखरे ह्या होत्या. कार्यक्रमाचे उद्घाटक ईतिहासाचे गाढे अभ्यासक प्राध्यापक रूपेश वनसिंगे यशवंत महाविद्यालय वर्धा हे होते.

प्रमुख पाहुणे म्हणून प्रा निलेश क्षिरसागर वर्धा, प्रा विशाल जुंबाडे आनंद निकेतन महाविद्यालय वरोरा, पत्रकार धर्मेंद्र शेरकुरे, पत्रकार ग्यानिवंत गेडाम, पत्रकार सहा शिक्षक प्रदिप कोहपरे यांची उपस्थिती होती. सर्व प्रथम शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. शिवाजी महाराज हे लढवय्ये मराठा योद्धे होते.त्यांनी जातं पात माणली नाही. शिवाजी महाराजांनी जिंकून ताबा मिळवलेल्या गड किल्ल्यांवर कधीच सत्यनारायणाची पूजा अर्चना,होम हवन केले नाही.अंधश्रद्धा माणली नाही. शिवाजी महाराज फक्त पन्नास वर्षे जगले.काही वर्ष जगले असते तर त्याकाळी महाराष्ट्र विकासाच्या प्रगतीत अग्रेसर असता .महाराजांनी मुघलांच्या तावडीतुन अनेक गडकिल्ले जिंकले. औरंगजेबाच्या तावडीतुन गरिबांची सुटका केली.पर स्त्रियांवर कधीच अन्याय केला नाही. उलट त्यांना सुरक्षा प्रदान केली असा आमचा राजा होता असे प्रा वनसिंगे म्हणाले. धर्मेंद्र शेरकुरे म्हणाले शिवाजी महाराजांच्या पहिल्या गुरू त्यांच्या मातोश्री राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ भोसले होय,मा जिजाऊ कडुन महाराजांना बालपणीच बाळकडू प्राप्त झाले. म्हणून महाराजांना तरूण वयात युद्ध करणे सोपे गेले, अनेक लढाया जिंकल्या, त्यांच्या सैन्यात विविध जाती धर्माचे लोक होते. जातीभेद केला नाही, म्हणून त्यांना जाणता राजा म्हणतात. शिवाजी महाराजांच्या दरबारात विविध खात्यांचे मंत्रीमंडळ होते ते कारभार चालवायचे, त्यामुळे स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शिवाजी महाराजांचा विषयी अभ्यास केला म्हणून संविधान लिहिणे सोपे गेले असे धर्मेंद्र शेरकुरे म्हणाले.यावेळी विद्या गोखरे, निलेश क्षिरसागर, विशाल जुंबाडे, यांनी ही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे संचालन सहा शिक्षक हर्षल चौधरी यांनी केले तर आभारप्रदर्शन आशीष येटे शिक्षक यांनी केले.



**विवेक विचार मंच वर्धा जिल्हा ने हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांना त्यांच्या जयंती निमित्त केले विनम्र अभिवादन आणि छत्रपतींच्या विचारांचा वारसा प्रत्यक्ष आचरणातून जगण्याचा आणि जपण्याचा केला संकल्प. याप्रसंगी जिल्हा संयोजक राहुल मुन,वामन वागदे,अमित भित्रे, संदिप सावरकर,वैभव वागदे,प्रशांत अवचट आणि विदर्भ प्रांत समन्वयक अतुल शेंडे व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.**

# सृष्टीचा सृजनकर्ता: श्रीविश्वकर्मा!

**श्रीविश्वकर्माजींनी महर्षी दधिची यांच्या हाडांपासून स्वर्गाधिपती इंद्रासाठी वज्र निर्माण केले, अशी मान्यता आहे. या वज्राच्या मदतीने इंद्राने अनेक असुरांचा वध केला होता. वज्रासह, श्रीकृष्णाची द्वारका नगरी, पांडवांसाठी इंद्रप्रस्थ, हस्तिनापूर नगर आणि रावणाच्या लंकेची निर्मितीही विश्वकर्मा यांनी केल्याचे म्हटले जाते. याशिवाय, महादेवाचे त्रिशूळ, विष्णूंचे सुदर्शन, यमराजाचा कालदंड, कर्णाची कुंडले आणि पुष्पक विमानाची निर्मितीही विश्वकर्मा यांनी केली आहे. अशी रोचक संकलित माहिती श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींच्या सदर लेखात जरूर वाचा... संपादक.**

भगवान श्रीविश्वकर्मा पूजा दिवस सामान्यतः कर्नाटक, आसाम, पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड, ओडिशा आणि त्रिपुरा इत्यादी राज्यांमध्ये दरवर्षी १७ सप्टेंबरच्या ग्रेगोरियन तारखेला साजरा केला जातो. हा उत्सव सहसा कारखाने आणि औद्योगिक भागात सामान्यतः दुकानाच्या मजल्यावर साजरा केला जातो. विश्वकर्मा हा जगाचा निर्माता आणि देवतांचा शिल्पकार मानला जातो. हे हिंदू कॅलेंडरच्या कन्या संक्रांती वर येते. हा सण प्रामुख्याने कारखाने आणि औद्योगिक भागात, अनेकदा दुकानाच्या मजल्यावर साजरा केला जातो. पूजेचा दिवस केवळ अभियंता आणि स्थापत्य समुदायाद्वारेच नव्हे तर कारागीर, यांत्रिकी, वेल्डर यांच्याद्वारे देखील श्रद्धेने चिन्हांकित केला जातो. औद्योगिक कामगार, कारखाना कामगार इ.चांगल्या भविष्यासाठी, सुरक्षित कामाच्या परिस्थितीसाठी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या संबंधित क्षेत्रात यश मिळवण्यासाठी प्रार्थना करतात. विविध मशीन्स सुरळीत चालण्यासाठी कामगार प्रार्थना करतात.

श्रीविश्वकर्मा पूजा दिवस हा हिंदू देव विश्वकर्मा, दैवी शिल्पकार यांच्यासाठी उत्सवाचा दिवस आहे. तो स्वयंभू आणि जगाचा निर्माता मानला जातो. त्याने द्वारका हे पवित्र शहर बांधले जेथे कृष्णाने राज्य केले, पांडवांची मायासभा आणि देवांसाठी अनेक भव्य शस्त्रे तयार केली. त्यांना बिल्डर, अभियंता, शास्त्रज्ञ जगाच्या निर्मात्याला देव म्हणतात. यापैकी पाच शास्त्रज्ञ निर्माते झाले आणि अनेक शास्त्रज्ञ निर्माते झाले. याचा५ उल्लेख ऋग्वेदात आहे आणि त्याचे श्रेय स्टेप्स वेद, यांत्रिकी आणि वास्तुशास्त्राचे विज्ञान आहे. विश्वकर्माच्या विशेष मूर्ती आणि प्रतिमा सामान्यतः प्रत्येक कामाच्या ठिकाणी आणि कारखान्यात स्थापित केल्या जातात. सर्व कामगार एका सामान्य ठिकाणी जमतात आणि पूजा करतात. विश्वकर्मा पूजेच्या तिसऱ्या दिवशी सर्वजण उत्साहात विश्वकर्माजींच्या मूर्तींचे विसर्जन करतात.

सृष्टीचा सृजनकर्ता म्हणून विश्वकर्माकडे पाहिले जाते. शास्त्रांमध्ये विश्वकर्मा यांचा जन्म भाद्रपद वद्य संक्रांतीला झाला होता, असे म्हटले आहे. परंतु, देशभरात यामध्ये मतभिन्नता आढळते. देशातील काही ठिकाणी दिवाळीत, तर काही ठिकाणी माघ महिन्यात विश्वकर्मा जयंती साजरी केली जाते. मात्र, बहुतांश ठिकाणी भाद्रपद वद्य संक्रांतीला विश्वकर्मा पूजनाची परंपरा सुरू असलेली आपल्याला पाहायला मिळते. सृष्टीच्या प्रारंभी केवळ विश्वकर्मा अस्तित्वात होता. समस्त प्राणीसृष्टीचा विश्वकर्मा जनक मानला गेला आहे. एक वैदिक देवता असा उल्लेखही काही ठिकाणी आढळतो. पुराणे व महाभारत यात विश्वकर्मांना देवांचा महान शिल्पशास्त्रज्ञ मानले आहे. ब्रह्मांच्या इच्छेनुसार विश्वकर्मांनी नवीन औजारे शोधलीत. सौर उर्जा वापरण्याचे व त्या उर्जेच्या नियंत्रणाचे ज्ञान त्यांना प्राप्त होते. सूर्य शक्तिचा वापर करून त्यांनी विष्णू, शिव व इंद्रासाठी अनुक्रमे सुदर्शन चक्र, त्रिशूळ व विजय रथ निर्माण केला. ते हरहुन्नरी होते. शस्त्रे व अस्त्रे, अलंकार, पुष्पक विमान आदींची निर्मिती त्यांनी केली. हजारो यंत्र-तंत्र, शस्त्रास्त्रे व साधनांची त्यांनी निर्मिती केली. सोनार, लोहार, सुतार, कुंभार, कासार समाजबांधव त्यांना आपले दैवत मानतात. कलियुगातही विश्वकर्मा यांचे पूजन अत्यंत लाभदायक मानले गेले आहे. विश्वकर्मांनी इंद्रासाठी इंद्रलोक, सुतलनामक पाताळलोक, श्रीकृष्णासाठी द्वारका नगरी, वृंदावन, राक्षसांसाठी लंका तसेच पांडवांसाठी हस्तिनापूर आणि इंद्रप्रस्थ, गरूड भवन आदींची निर्मिती केली. विश्वकर्मा यांनी श्रीरामांना सहकार्य केले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखालीच महाबली हनुमान, विश्वकर्मा पुत्र नल व नील यांनी रामसेतू बांधला. विश्वकर्मा यांनी १४ ब्रम्हांडाची रचना केली. त्यात वायुमंडळ, कैलास, वैकुंठ, ब्रम्हपुरी, इंद्रपुरी, स्वर्ग, पृथ्वी, पाताळातील नागलोक आदींची रचना केली. याशिवाय जगन्नाथ पुरी येथील भगवान जगन्नाथ, बलभद्र



आणि सुभद्रा यांच्या मूर्ती, लंका, श्रीकृष्णांची द्वारका अशा अनेकविध दिव्य वास्तूंची निर्मिती विश्वकर्मांनी केली होती, असे सांगितले जाते.

भारतात १७ सप्टेंबर हा दिवस राष्ट्रीय श्रम दिवस आणि श्रीविश्वकर्मा जयंती म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवशी विश्वकर्मा यांची पूजा केली जाते, स्मरण केले जाते. या दिवशी उपलब्ध सर्व शस्त्रांची, दररोज उपायोगात येणारी यंत्रे, तंत्रे यांचे पूजन केले जाते. कलियुगात आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात प्रत्येक जण लॅपटॉप, मोबाइल आणि टॅबलेट अगदी दररोज वापरतो. हीदेखील यंत्रे आणि शस्त्रे आहेत, यांशिवाय आपले पानही हलत नाही. त्यामुळे या यंत्रांचे पूजन करणे लाभदायक ठरते, असे सांगितले जाते. विश्वकर्मा पूजनाच्या निमित्ताने या यंत्र–शस्त्रांप्रति कृतज्ञता व्यक्त करावी, असे सांगितले जाते. भाद्रपद वद्य संक्रांतीला असलेल्या विश्वकर्मा जयंतीनिमित्त घर आणि कारखाना किंवा कार्यालयात वापरली जाणारी अवजारे, शस्त्रे, हत्यारे, यंत्रे यांचे पूजन केले जाते. सर्व अवजारे, शस्त्रे, हत्यारे, यंत्रे यांची स्वच्छता केली जाते. त्याला तेल–पाणी, ग्रीसिंग केले जाते. यानंतर विश्वकर्मा पूजन केले जाते. कार्यालय व कारखान्यातील सर्व कर्मचाऱ्यांना प्रसादाचे वाटप केले जाते. उपस्थित सर्वजण एकमेकांना विश्वकर्मा जयंतीनिमित्त शुभेच्छा देतात आणि विश्वकर्मा यांचे मनोभावे स्मरण करतात. ब्रह्मांडातील प्रथम शिल्पकार, वास्तुकार आणि अभियंता म्हणून विश्वकर्मा यांची ख्याती आहे.

श्रीविश्वकर्मा पूजनात कलश, अक्षता, फुले, मिठाई, फळ, सुपारी, धूप, दीप, रक्षासूत्र, दही आणि विश्वकर्मा यांची तसबीर आदी पूजासाहित्य एकत्र केले जाते. यानंतर अष्टदलाची रांगोळी काढली जाते. यानंतर एका चौरंगावर विश्वकर्मा यांची तसबीर स्थापन करण्यात येते. विश्वकर्मा यांची पंचोपचार पूजा होते. यानंतर अक्षता, चंदन, हळद–कुंकू अर्पण केले जाते. ऋतोकालोद्भव फुले, फळे, धूप, दीप, नैवेद्य अर्पण करतात. विश्वकर्मा यांचे स्मरण करून त्यानंतर कारखाने, कार्यालयातील सर्व अवजारे, हत्यारे, शस्त्रे, यंत्रे यांचे पूजन केले जाते. या सर्वांना गंधाक्षता अर्पण केले जातात. यावेळी ॐ पृथिव्यै नमः। ॐ अनंतम नमः।। ॐ कूमयि नमः। ॐ श्री सृष्टतनया सर्वसिद्धया विश्वकर्माया नमो नमः।। असे मंत्र म्हणून कलशातील पाणी अवजारे, शस्त्रे, यंत्रे यांच्यावर शिंपडले जाते. यानंतर सर्व उपस्थित मंडळी विश्वकर्मांची आरती करतात आणि प्रसादाचे वाटप करण्यात येते. भारतीय संस्कृती, परंपरांमध्ये विश्वकर्मा पूजनाला विशेष महत्त्व आहे. यावेळी करण्यात येणाऱ्या अवजार, शस्त्रे, यंत्र, हत्यारे यांच्या पूजनालाही महत्त्व आहे. या माध्यमातून त्यांविषयी आपण कृतज्ञता व्यक्त करत असतो. आपल्यासाठी झटणाऱ्या अगदी निर्जीव गोष्टींचाही आपण मान राखला पाहिजे, असा महत्त्वाचा संस्कार यामधून होतो, असे सांगितले जाते. तसेच या पूजनामुळे यंत्रे, शस्त्रे, हत्यारे, अवजारे आपला विश्वासघात करत नाहीत. कोणत्याही प्रसंगात आपली साथ कायम ठेवतात, अशी लोकमान्यता असल्याचे सांगितले जाते. विश्वकर्मा यांच्या जन्माबाबत शास्त्रांमध्ये बरीच मतमतांतरे आहेत. एका शास्त्रानुसार, ब्रह्म देवाचे पुत्र धर्म, धर्माचे पुत्र वास्तूदेव आहे. वास्तूदेव आणि अंगिरसी यांचे पुत्र विश्वकर्मा आहेत. स्कंद पुराणाप्रमाणे, धर्म ऋषींचे आठवे पुत्र प्रभास होते. प्रभास यांचा विवाह बृहस्पती ऋषींच्या भगिनी भुवना ब्रह्मवादिनी यांच्याशी झाला. भुवना ब्रह्मवादिनी यांचे पुत्र विश्वकर्मा आहेत. तर, महाभारतातही विश्वकर्मांचा उल्लेख आढळतो. वराह पुराणानुसार ब्रह्म देवांनी विश्वकर्मा यांना पृथ्वीवर जाण्याची आज्ञा केली. विश्वकर्मा यांनी पृथ्वीवर अनेक महाल, वास्तू, शस्त्र यांची निर्मिती केली.

श्रीविश्वकर्माजींनी महर्षी दधिची यांच्या हाडांपासून स्वर्गाधिपती इंद्रासाठी वज्र निर्माण केले, अशी मान्यता आहे. या वज्राच्या मदतीने इंद्राने अनेक असुरांचा वध केला होता. वज्रासह, श्रीकृष्णाची द्वारका नगरी, पांडवांसाठी इंद्रप्रस्थ, हस्तिनापूर नगर आणि रावणाच्या लंकेची निर्मितीही विश्वकर्मा यांनी केल्याचे म्हटले जाते. याशिवाय, महादेवाचे त्रिशूळ, विष्णूंचे सुदर्शन, यमराजाचा कालदंड, कर्णाची कुंडले आणि पुष्पक विमानाची निर्मितीही विश्वकर्मा यांनी केली आहे.

!! जयंतीच्या पावन पर्वावर श्री विश्वकर्माजींच्या पावन चरणी विनम्र अभिवादन !!

**संकलन व सुलेखन –**
**श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सप– ९४२३७१४८८३.**


# प्रभू विश्वकर्मा जन्मोत्सव निमित्त विभिन्न कार्यक्रम

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिय विश्वकर्मा पांचाळ समाज सेवा समितीच्या वतीने प्रभू विश्वकर्मा जयंतीचे साबळे प्लॉट अमरावती रोड पुलगांव या ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दि.२२ फेब्रुवारीला सकाळी ११ वाजता ह.भ.प.कु पुनमताई दुर्गे, नाचनगांव यांचे काल्याचे किर्तन , गुरूदेव सेवा मंडळ यांचे भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

प्रभु विश्वकर्मा प्रतिमेची प्रतिष्ठापना व पूजन होणार आहे. दुपारी १ ते४ वाजता दरम्यान महाप्रसाद सांस्कृतिक, सुरधूर गीते व मनोरंजनाचे कार्यक्रम होईल.प्रतिष्ठित नागरिक उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विश्वकर्मा पांचाळ



समाज सेवा मंडळ पुलगांव यांनी केले आहे.प्रभू श्री विश्वकर्मा प्रस्तावित मंदीराचे बांधकाम सुरू आहे बांधकामास सहकार्य करावे, अशी विनंती विश्वकर्मा विकास मंडळ पुलगांव यांनी विनंती केली आहे.

# प्रकल्प कार्यालयाच्या नूतन इमारतीचे लोकार्पण व आदिवासी लाभार्थी मेळाव्याचे आयोजन

**चंद्रपूर**–एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या नूतन इमारतीचा लोकार्पण सोहळा व तदनंतर आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे पात्र लाभार्थ्यांना वाटप मेळावा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.२३ फेब्रुवारी रोजी सायकांळी ५ वाजता नियोजन भवन सभागृह येथे सदर मेळावा कार्यक्रम पार पडणार आहे.तसेच दि. २४ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी १० वाजता, शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा देवाडा (ता. राजुरा) येथे आदिवासी लाभार्थी व पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाला वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत लाभार्थ्यांना विविध योजनांचे वाटप करण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त आदिवासी बांधवांनी मेळाव्यास उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाचे प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांनी केले आहे.

# सावरगाव येथील लोक विद्यालयात शिवजयंती



**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

द रुरल एज्युकेशन सोसायटी ब्रह्मपुरी द्वारा संचालित नागभीड तालुक्यातील सावरगाव येथील लोक विद्यालय छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यानंतर त्यांना माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक पुरुषोत्तम कामडी,जेष्ट शिक्षक नरेंद्र घोडमारे,देशमुख,सहाय्यक शिक्षक राजू आमले,सहायक शिक्षिका संगीता ढोके,सहाय्यक शिक्षक पद्माकर निखारे,शैलेश खंडारे,श्रीकांत बोरकर आदि शिक्षकांची उपस्थिती होती. याप्रसंगी मुख्याध्यापक कामडी यांनी मार्गदर्शनपर भाषणात उपस्थित विद्यार्थ्यांना शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यांची व त्यांच्या लढव्यय वृत्तीची सविस्तर माहिती सांगितली.यावेळी विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र गीताचे सामूहिक गायन केले. संचालन श्रीकांत बोरकर यांनी केले.या कार्यक्रमाला विद्यालयाचे सर्व शिक्षक,शिक्षिका,शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी – विद्यार्थिनी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मास्टर्स ॲथलेटिक्स स्पर्धेत पुलगावचे देवेंद्र सोनटक्के आंतरराष्ट्रीय पातळीवर

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक पुलगाव येथील मिहिर क्का चे संचालक देवेंद्र सोनटक्के यांनी ४०० मीटर हर्डल ह्या खेळ प्रकारात सुवर्ण पदक प्राप्त करीत आंतर राष्ट्रीय पातळी गाठली. ४४ व्या मास्टर्स स्पर्धेत त्यांचे ४०० मीटर हर्डल प्रकारात भारतीय टीम मध्ये चयन झाले आहे. ते आता ४०० मीटर हर्डल्स प्रकारात भारताचे प्रतिनधीत्व करणार आहेत.त्यांनी क्रीडा संकुल बालेवाडी पुणे या ठिकाणी झालेल्या राष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट कामगिरी बजावत आंतरराष्ट्रीय पातळी गाठली.

४४ व्या मास्टर्स स्पर्धेमध्ये देशभरातून जम्मू काश्मीर पासून तर केरळ, कर्नाटकापर्यंत



जवळपास संपूर्ण राज्यातील जवळपास ७०० स्पर्धकांनी वेगवेगळ्या मैदानी खेळ प्रकारात भाग घेतलेला होता. महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करताना सोनटक्के यांनी प्रथम क्रमांक प्राप्त करीत भारताच्या सहा जणांच्या टीम मध्ये स्वतःचे स्थान निश्चित केले. येत्या ऑगस्टमध्ये स्वीडन राष्ट्रामध्ये होणाऱ्या मास्टर्स आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग घेण्यासाठी ते आता जाणार आहेत. शिक्षकी पेशा सांभाळत विद्यार्थ्यांना साहसी उपक्रमासाठी प्रेरणा देणे,त्याचप्रमाणे त्यांच्यामध्ये राष्ट्रभक्ती आणि शारीरिक स्वास्थ्य याबद्दल जाणीव आणि जागृती निर्माण करणे यासाठी सोनटक्के विद्यार्थ्यांना प्रेरित करत असतात.

त्यांना मिळालेल्या या यशाबद्दल पुलगाव – नाचनगाव शहरातील नागरिक त्याचप्रमाणे मित्रपरिवार आणि वर्धा जिल्हा मास्टर्स एथेलेटीक्स असोशिएशन तर्फे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

# आरडी एजंट ते प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी सातत्यपूर्ण परिश्रमातून मनीषने मिळवलेले यश ठरत आहे प्रेरणादायी

**गोंडपिपरी । सूरज माडूरवार**

घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची अल्पभूधारक शेतकरी अशातच जगण्यासाठी धडपड करत आरडी एजंट बनले त्यातून ओडख निर्माण करत एलआयसी एजंट बनून थोडी आर्थिक परिस्थिती सुधारली.अभ्यासात हुशार असल्याने परिश्रमातून शिक्षण पूर्ण केले.डी फॉर्म,एमएससी,एम फिल,पीएचडी असे विविध अभ्यासक्रम त्यांनी यशस्वीरित्या पूर्ण केले.उच्चशिक्षण घेऊन यशस्वीही झाले रक्त तपासणी लॅब टाकली त्यातून आर्थिक उत्पन वाढले.तरीही ते अभ्यास करत राहिले आणि वयाच्या ४४ व्या वर्षी मिळवले परीक्षेत यश. गोंडपिंपरी तालुक्यातील मूळचे गणेशपिपरी या गावचे मनीष वासमवार यांनी आर्थिक परिस्थिती हलाखीची असताना मिळेल ते काम केले होते संघर्ष केला आनी



आर्थिक उन्नती साधली.त्यात ते दहा वर्षांपासून राजकारणात सक्रिय आहेत.त्यांच्या पत्नी उच्चशिक्षित किरण मनीष वासनवार या सरपंच बनल्या त्यानंतर मनीष वासमवार यांनी पंचायत समिती लढली आणि जिंकली सुद्धा उपसभापती पद मिळवले.यासह ते गोंडपिपरितील स्वामी विवेकानंद कॉन्व्हेंटचे सचिव,संजय गांधी निराधार योजना समिति सदस्य,रुग्ण कल्याण समिती सदस्य अशा पदावर काम करत असताना सुधा सातत्याने अभ्यास करत राहिले.डिसेंबर २०२३ मधे आरोग्य विभागाच्या जागा निघाल्या.विदर्भातून अनु.जाती प्रवर्गातून प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकाऱ्याची एकच जागा होती.त्यांनी स्पर्धा परीक्षा दिली.त्याचा निकाल नुकताच जाहीर झाला.यात नागपूर विभागातून त्यांची वैज्ञानिक अधिकारी पदी निवड झाली त्यांना नियुक्तीपत्र मिळाले व ते शनिवारी दि.(१७) गडचिरोली जिल्ह्यात रुजू झाले.सातत्यपूर्ण प्रयत्न ,प्रबळ इच्छाशक्ती व प्रभावी नियोजन केल्यानेच यश मिळाल्याचे मनीष वासमवार यांनी बोलताना सांगितले.

# शिवजन्मोत्सवा निमित्य सावरगाव इथे रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

शिवजन्मोत्सव समिती सावरगाव च्या वतीने राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९४ व्या जयंती चे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले.

दिनांक १९ फेब्रुवारीला शिवजनमोत्सव समिती सावरगाव च्या वतीने जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सावरगाव इथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिवजनमोत्सवाची सुरवात सकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण,दीपप्रज्वला नंतर अभिवादन करून झाली.या रक्तदान शिबिरामध्ये सामाजिक कार्यकर्ते, तरुण, सेविका यांनी उत्सुफूर्त पणे रक्तदान केले. एकुन ३५पेक्षा अधिक रक्तदात्यांनी रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकी जोपासली.डॉ. हेडगेवार रक्तपेटी नागपूर, यांची चमू डॉ. आर. बी. रणदिवे, प्रेमीला शेटे यांच्या सहकार्याने रक्तसंकलन करण्यात आले. सायंकाळी गावातुन मोठया उत्सहात शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे वाजत गाजत मिरवणुक काढण्यात आली आणि दरम्यान शिवाजी महाराजांचे



विचार व आदर्श कृतितुन आचारावे असे संबोधन करण्यात आले.

या शिवजन्मोत्सव सोहळ्याच्या यशस्वितेकारिता प्रा. युवराज रामटेके, विकास बोरकर, हितेश मुंगमोडे, गिरीधर निकुरे, वेदप्रकाश मेश्राम, प्रणय मुंगमोडे, जतीन खोब्रागडे, महेश बोरकर, प्रशांत सहारे, भुवनेश कोहरे आणि शिवजन्मोत्सव समितीचे सर्व सदस्य, तरुण, ग्रामस्थ यांनी मोठया उत्साहाने सहकार्य केले.

# २२ फेब्रुवारी रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडल करिअर सेंटर आणि शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वरोरा यांच्या संयुक्त विद्यमाने, २२ फेब्रुवारी २०२४ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जुने डिएड/बिएड कॉलेज, आनंदवन चौक, वरोरा येथे सकाळी ११ वाजता सदर रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून १०वी, १२वी, आय.टी.आय., पदविका, पदवी आदी बेरोजगार उमेदवारांना विविध क्षेत्रात असलेल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे तसेच राज्यातील नामांकित उद्योजकांचा थेट नोकरी इच्छुक उमेदवारांशी संपर्क करण्याच्या दृष्टीने रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. या रोजगार मेळाव्यात ८५० पेक्षा जास्त पदे भरण्यात येणार असून विविध नामांकित कंपन्या सहभागी होत आहे. या माध्यमातून चंद्रपूर, पुणे येथे रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

या आहेत मेळाव्यात सहभागी नामांकित कंपन्या:स्पंदना स्फुर्ती फायनन्स प्रा.लिमिटेड, चंद्रपूर, जय महाराष्ट्र प्लेसमेंट सर्विसेस, भारत पे प्रा.लिमि., विदर्भ क्लिक १ सोल्यूशन, एल.आय.सी ऑफ इंडीया, नवभारत फर्टिलायझर औरंगाबाद, आणि टॅलेनसेतू प्रा. लि. पुणे आदी कंपन्या सहभागी होणार असून सदर कंपन्यामध्ये विविध पदे असल्याचे उद्योजकांकडून कळविण्यात आले आहे.

नोंदणी व आवश्यक कागदपत्रे:उमेदवारांनी आधारकार्ड व शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्राचे झेरॉक्स प्रतीसह (कमीत कमी तीन प्रती) उपस्थित राहावे. मेळाव्यात सहभागी होण्याकरीता https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबसाईटवर नोंदणी करुन ऑनलाईन ॲप्लाय करावे.

सदर मेळाव्याचे उद्घाटन सहायक जिल्हाधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते होणार आहे. या मेळाव्याचे वैशिष्टय म्हणजे सदर मेळावा नि:शुल्क असून उमेदवारांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. अधिक माहितीकरीता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या ०७१७२–२५२२९५ दुरध्वनी क्रमाकांवर संपर्क साधावा.

जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी रोजगार मेळाव्यात सहभागी होवून लाभ घेण्याचे आवाहन मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त भैय्याजी येरमे यांनी केले आहे.

# वनसेवा ही प्रेरणा देणारी सेवा-प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी

## वन प्रबोधिनी येथे दीक्षांत समारंभ व पासिंग आऊट परेडचे आयोजन

**चंद्रपूर**–चंद्रपूर वन प्रबोधिनी ही वन्यजीव व्यवस्थापन व उत्पादन वानिकी या क्षेत्रातील राज्याची शिखर प्रशिक्षण संस्था आहे. या प्रबोधिनीमध्ये वन विभागातील विविध संवर्गातील अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित केले जाते. येथे प्रशिक्षण घेतलेले सर्वजण उत्तम प्रशासक होतील आणि क्षमता बांधणीसह कौशल्य व आपल्या ज्ञानाचा उपयोग करून हवामान बदल, मानव वन्यजीव संघर्ष या भविष्याशी निगडीत आव्हानांचा सामना करतील. कारण वनसेवा ही प्रेरणा देणारी सेवा आहे, असे वन विभागाचे प्रधान सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी यांनी सांगितले.

वन प्रबोधिनी येथे आयोजित दीक्षांत समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवड करण्यात आलेल्या ४४ वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांचे १८ महिने कालावधीचे प्रशिक्षण येथे आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणार्थी वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी सदर प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केल्यामुळे पासिंग आऊट परेडचे तसेच प्रमाणपत्र वितरणाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वनबल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक) शोमिता बिश्वास, तसेच चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापनचे संचालक एम. एस. रेड्डी, चंद्रपूरचे मुख्य वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर तसेच इतर अधिकारी उपस्थित होते. या समारंभामध्ये प्रशिक्षण पुर्ण करून वन विभागामध्ये रुजु होण्यासाठी सज्ज झालेल्या वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना कर्तव्याप्रती निष्ठा बाळगण्याची शपथ देण्यात आली.वन प्रबोधिनीचे संचालक, एम. एस. रेड्डी म्हणाले, २२ ऑगस्ट २०२२ पासुन २१ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवड करण्यात आलेल्या ४४ वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांचे १८ महिने कालावधीचे प्रशिक्षण येथे आयोजित करण्यात आले. येथील प्रशिक्षणाबरोबरच भारतातील विविध १९ राज्ये व ४ केंद्रशासित प्रदेशातील अनेक वन व वन्यजीव व्यवस्थापनाचे दृष्टीने महत्वाच्या ठिकाणी अभ्यास दौरे आयोजित करण्यात आले. या ४४ प्रशिक्षणार्थ्यांपैकी ३५ अधिकारी हे विशेष प्रविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. या प्रशिक्षणाकरीता महाराष्ट्रातुन ४१ तर आंध्रप्रदेश, हिमाचल प्रदेश व मिझोरम या राज्यातील प्रत्येकी एक अशा ४४ प्रशिक्षणार्थ्यांनी सहभाग घेऊन हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केले.याप्रसंगी बोलतांना वनबल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर, यांनी सर्व प्रशिक्षणार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच त्यांना वन्यजीव संरक्षणाच्या क्षेत्रात उत्कृष्ट काम करण्याचे आवाहन केले. तसेच जैवविविधता संवर्धन, अवनत वनजमिनी पुनःसंचयीत करणे, यासारख्या नवीन क्षेत्रामध्ये काम करण्याची सुचना केली. प्रशासकीय कौशल्य आत्मसात करून उत्तम प्रशासक होण्यासाठी वाचन, लेखन निरंतर सुरू ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले.या कार्यक्रमामध्ये प्रशिक्षण पुर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. तसेच या कालावधीत विविध विषयांत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना सुवर्ण व रौप्य पदक देऊन गौरविण्यात आले.



## माघी यात्रे करिता अडीच लाखाहून अधिक भाविकांचे पंढरीत आगमन

**पंढरपूर** – माघी यात्रेच्या सोहळ्याकरिता अडीच लाखाहून अधिक भाविकांचे पंढरीत आगमन झाले आहे. मंगळवारी (ता.२०) माघी एकादशी दिवशी चंद्रभागा नदीस्नानाची पर्वणी साधण्यासाठी लाखो भाविक चंद्रभागे तिरी जमणार आहेत. मात्र चंद्रभागा नदीत स्नानासाठी पुरेसे पाणी नसल्याने भाविकांमधून नाराजी व्यक्त होत आहे.दरम्यान सोमवारी (ता. १९) श्री विठ्ठलाच्या दर्शनाची रांग आठ नंबरच्या पत्रा शेड पर्यंत गेली असून श्रींच्या दर्शनासाठी १६ ते १८ तास लागत आहेत.माघी यात्रेच्या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी महाराष्ट्र, तेलंगणा व कर्नाटक राज्यातून लाखो भाविक पंढरीत दाखल झाले आहेत. भाविकांच्या गर्दीने ६५ एकर, श्री विठ्ठल मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग फुलून गेला आहे. दरम्यान यावर्षी फेब्रुवारीमध्ये चंद्रभागा नदीतील पाणी पातळी कमालीची घटली आहे. त्यामुळे माघी यात्रेला आलेल्या भाविकांना नदीत स्नान करण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध नाही.माघी एकादशी दिवशी चंद्रभागा नदी स्नान हे पवित्र मानले जाते. मात्र नदीपात्रात सध्याच



जे पाणी उपलब्ध आहे ते देखील अस्वच्छ आहे. त्यामुळे भाविकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान दशमी दिवशी (ता. १९) गोपाळपूर रस्त्यालगतच्या पत्रा शेडमधील दर्शन रांग आठ नंबर पत्रा शेडच्या पुढे गेली होती.पत्रा शेड दर्शन रांगेतील हजारो भाविकांसाठी श्री विठ्ठल मंदिर समितीने अन्नछत्र सुरू केले आहे. समितीच्या वतीने नवमी दिवशी भाविकांना तांदळाची खिचडी, गोड व तिखट बुंदी, दशमी दिवशी पुरी भाजीचे वाटप करण्यात आले तर एकादशी दिवशी साबुदाणा खिचडीचे वाटप करण्यात येणार आहे.सोमवारी श्री विठ्ठल दर्शन घेऊन मंदिरातून बाहेर आलेले रामचंद्र बाबुराव कदम (रा.जामगे, ता.दापोली, जि. रत्नागिरी)' सकाळ ' शी बोलताना म्हणाले, रविवारी सायंकाळी सात वाजता आठ नंबरच्या पत्रा शेड दर्शन रांगेत होतो; सुमारे सतरा तासांनी सोमवारी दुपारी बारा वाजता श्री विठ्ठलाचे दर्शन प्राप्त झाले.आम्ही पंचक्रोशीतील शेकडो भाविक पायी चालत दिंडी मधून पंढरपूरला आलो आहोत. मात्र आज श्री विठ्ठलाचे दर्शन झाल्याने सगळा शीण निघून गेला. दरम्यान मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या रास्ता रोको आंदोलनामुळे मराठवाडा भागातील काही ठिकाणी एसटीच्या वाहतुकीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे एसटी प्रवासामध्ये ५० टक्के सवलत असलेल्या महिला भाविकांच्या संख्येत यंदा घट झाल्याचे जाणवत आहे.

## भुरट्या चोरांकडून नाम फलकची पाटी व सौर ऊर्जेची प्लेट चोरीला




**जिंतूर । प्रतिनिधी**

जिंतूर परभणी महामार्गावर असलेल्या बोरी जवळील शेक पाटीवर लावण्यात आलेली शेक गावाच्या नाम फलकाची पार्टी भुरट्या चोरांनी पळवली तर जिंतूर तालुक्यातील कौसडी येथील बसवेश्वर नगर मधील अंगणवाडी क्र.-५ च्या छतावर लावण्यात आलेल्या सौर ऊर्जेचे दोन प्लेट चोरीला गेले.

या दोन्ही घटना दिनांक १७ फेब्रुवारी शनिवार रोजी रात्री घडली आहे.

बसवेश्वर नगर येथे पाणीपुरवठा करण्यासाठी सौर ऊर्जेचे पंप जोडले होते हे सौर ऊर्जेचे पंप काही दिवसापासून बंद होते. सौर ऊर्जेचे पंपासाठी अंगणवाडीच्या छतावर सौर ऊर्जेचे प्लेट लावण्यात आले होते त्या प्लेट मधून दोन प्लेट शनिवारी रात्री चोरीला गेले. सौर ऊर्जेच्या प्लेटांची चोरी ची तक्रार कोणीही पोलिसात दाखल केली नाही. जिंतूर परभणी महामार्गावरील शेक पाटीवर गावाच्या नाम फलकाची पाटी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून लावण्यात आली होती त्या नाम फलकाच्या पाठीची भुरट्या चोरट्यांकडून चोरी करण्यात आली. ती नाम फलक्याची पाटी चोरीला गेली त्याची तक्रार कोणीही दाखल केले नाही. कौसडी बोरी परिसरात भुरट्या चोरट्यांचा धुमाकूळ झाला असून काही दिवसापूर्वी कुंभारी या गावात ग्रामपंचायत कार्यालयासह इतर घरे भुरट्या चोरट्यांकडून फोडण्यात आले होते.

## मराठा समाजाच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम-राज ठाकरे

**मुंबई**–राज्य सरकारला मराठा समाजाला आरक्षण देण्याचा अधिकार आहे का? असा प्रश्न उपस्थित करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. मराठा समाजाने सावध राहावे, मराठा समाजाच्या तोंडाला पाणी पुसण्याचे हे सर्व प्रकार सुरू असल्याचा आरोप राज ठाकरे यांनी केला आहे. निवडणुकीच्या तोंडावर काहीतरी करायचं म्हणून अधिवेशन घेण्यात आलं असल्याचा आरोप देखील राज ठाकरे यांनी केला आहे.समाजाच्या माझ्या सर्व बांधवांनी आणि भगिनींनी जागृत राहावे. हे मराठा समाजाच्या तोंडाला पाने पुसण्याचा काम असल्याचा आरोप राज ठाकरे यांनी केला. अशाच प्रकारचे आरक्षण हे तामिळनाडू राज्य सरकारने दिले होते. त्या प्रकरणाची केस देखील अजूनही सुप्रीम कोर्टात सुरू आहे. त्या प्रकरणाचे पुढे काहीही झाले नाही. असेच काही सध्या मराठा आरक्षणासंदर्भात चालू आहे. मी आधीच सांगितल्याप्रमाणे यामध्ये अनेक तांत्रिक अडचणी आहेत. सरकारने दिले म्हणून यात आनंद मानण्याचे काहीच कारण नाही. हे नेमके काय आहे? हे मराठा



समाजाने सरकारला विचारलं पाहिजे. मुळात राज्य सरकारला आरक्षण देण्याचा अधिकार आहे काय? असा प्रश्न राज ठाकरे यांनी उपस्थित केला.निवडणुकीच्या तोंडावरती या सर्व गोष्टी करण्यास काही अर्थ नसल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. पुढील काळात सर्वोच्च न्यायालयात हे आरक्षण अडकेल आणि सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण गेल्यानंतर हात वर करायचे की, प्रकरण न्यायालयात आहे. असेच या प्रकरणी होणार असल्याचा आरोप राज ठाकरे यांनी केला आहे. राज्य सरकारला मराठा आरक्षण देण्याचा अधिकारच नसल्याचे राज ठाकरे यांनी पुन्हा एकदा म्हटले आहे. समाजाला आरक्षण देण्याचा अधिकार केवळ केंद्र सरकारला असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. देशामध्ये अनेक राज्य आहेत आणि प्रत्येक राज्यांमध्ये अनेक विषय आहेत. असं एखाद्या राज्यात एखाद्या समाजाबद्दल असे करता येत नसल्याचे राज ठाकरे यांनी म्हटल आहे. या सर्व बाबींकडे समाजाने लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे देखील ते म्हणाले.राज्यात अनेक महत्त्वाचे प्रश्न आहेत. फेब्रुवारी महिना सुरू आहे आणि राज्यात दुष्काळाचा विषय अतिशय गंभीर बनला आहे. मात्र, याकडे कोणाचेही लक्ष नसल्याचा आरोप मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी केला आहे. महत्त्वाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करायचे आणि निवडणुका आणि राजकारणाकडे लक्ष देणे असा प्रकार सध्या महाराष्ट्रात सुरू असल्याचा आरोप देखील राज ठाकरे यांनी केला आहे.मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारने दिलेला आरक्षणाला विरोध केला आहे. आम्ही मागणी केल्याप्रमाणे ओबीसी समाजातच मराठा समाजाला आरक्षण द्यावे, अशी मागणी देखील मनोज जरांगे यांनी केली आहे. आम्ही मागणी केल्याप्रमाणे ओबीसी समाजातच मराठा समाजाला आरक्षण द्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. त्याचप्रमाणे पुन्हा एकदा उपोषण करण्याचा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. या संदर्भात राज ठाकरे यांना प्रश्न विचारले असता या संदर्भात मला काहीही बोलायचे नसल्याचे सांगितले आहे.

## २४ फेब्रुवारी रोजी रन फॉर व्होट मिनी मॅरेथॉनचे आयोजन

**चंद्रपूर**–लोकसभा निवडणूक-२०२४ च्या पार्श्वभुमीवर, लोकशाही बळकटीकरणासाठी तसेच नागरिकांच्या उज्वल भवितव्यासाठी मतदार जागृती अभियान जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत २४ फेब्रुवारी रोजी रन फॉर व्होट मिनी मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. या मिनी मॅरेथॉनमध्ये चंद्रपुरातील सर्व मतदार बंधू-भगिनींनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले आहे.

मिनी मॅरेथॉनला शनिवार, दि. २४ फेब्रुवारी रोजी सकाळी ६ वाजता, चांदा क्लब ग्राउंड येथून सुरुवात होईल. या मॅरेथॉनमध्ये जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्यासमवेत मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, महानगरपालिका आयुक्त विपिन पालीवाल, उपविभागीय अधिकारी रणजीत यादव, तहसीलदार विजय पवार आदी सहभागी होतील.असा असेल मॅरेथॉन मार्ग :चांदा क्लब ग्राउंड - जटपुरा गेट - गिरणार चौक - जोड देऊळ - गांधी चौक - जटपुरा गेट - आंबेडकर कॉलेज व नंतर चांदा क्लब ग्राउंड येथे मॅरेथॉनचा समारोप होईल. अधिक माहितीसाठी ९६३७१९७४६९, ९८२२४४९९१६, ८६६८२५८५२२ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे प्रशासनामार्फत कळविण्यात आले आहे.

### परदेशी पाहुण्यांच्या उपस्थितीने संपन्न झाले

## एम.ए.बी.डी.इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासुटिकल एज्युकेशनचे स्नेह संमेलन

**येवला । प्रतिनिधी**

फार्मासिटिकल एज्युकेशन अँड रिसर्च येथे दर वर्षी प्रमाणे याही वर्षी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबर त्यांचे वक्तृत्व व कलागुणांना वाव मिळण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते यावर्षी कार्यक्रमाची थीम अंतरंग २ज्ञ२४ अशी होती. या कार्यक्रमासाठी अमेरिका येथील पाहुणे श्री.प्रफुल्ल भगत चेअरमन एज्युकेशन डिव्हिजन ऑफ अमेरिकन स्टँडर्ड ऑफ कॉलिटी हे होते. या वेळी त्यांनी औषधनिर्माणशास्त्र विद्यार्थ्यांना अमेरिका येथे नोकरीच्या संधिबाबत मार्गदर्शन केले. अंतरंग २ज्ञ२४ ची सर्वात दि. १०/०२/२४ रोजी एम. के. डी. एज्युकेशन सोसायटी चे संचालक श्री. शुभम दादा दराडे यांच्या हस्ते झाली. या कार्यक्रमामध्ये विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते विजयी विद्यार्थ्यांना पाहुण्याच्या हस्ते पारितोषिक वितरण




करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य. श्री सुरवसे के पी. यांनी पाहुण्याचे स्वागत करून उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जगदंबा शिक्षण संस्थेचे संचालक श्री. रुपेश दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमास एस.एन. डी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग चे प्राचार्य श्री यादव सर व एस. एन. डी. इंग्लिश मिडयम स्कूल चे प्राचार्य श्री शिंदे सर तसेच सांस्कृतीक विभागप्रमुख जाधव शुभांगी, समाधान कांबळे अतुल चौधरी यावेळी सुदर्शन गायकवाड यांनी भविष्यात फार्मसीला कशाप्रकारे स्कोप आहे हे थोडक्यात मार्गदर्शन केले यावेळी कार्यालय प्रभारी योगेश भावसार हे उपस्थित होते.

## शाळांनी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे अर्ज

### ऑनलाईन स्वरुपात भरणे अनिवार्य

चंद्रपूर, दि. २१: जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालयातंर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे मैट्रिकपूर्व शिष्यवृत्तीचे अर्ज स्वीकारण्यात येतात व पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ अदा करण्यात येतो. तसेच या कार्यालयामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या विविध शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येतात.

समाजकल्याण विभागाचे सहआयुक्त (शिक्षण) यांच्या आदेशान्वये, जिल्ह्यातील सर्व शाळांनी इयत्ता ९वी व १०वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे भारत सरकार शिष्यवृत्तीचे अर्ज तसेच अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती या दोन योजनांचे अर्ज http://prematric.mahait.org/Login/Login या संकेतस्थळावर ऑनलाईन स्वरुपात भरणे अनिवार्य आहे.अर्जांची ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी कार्यप्रणाली अवलंबिण्यात आली आहे. यामध्ये महाडीबीटी प्रणालीद्वारे http://prematric.mahait.org/Login/Login वर ऑनलाईन स्वरुपात अर्ज भरावेत. मुख्याध्यापक लॉगीन तयार करणे यामध्ये महाडीबीटी पोर्टलवर प्री-मैट्रिक योजनेच्या अर्ज नोंदणीसाठी शाळेच्या मुख्याध्यापकांनी युजर-आयडीमध्ये PrešSE27XXXXXXXXXšPrincipal आणि पासवर्ड झरींी१२३ टाईप करून लॉगीन करावे. शाळेचे प्रोफाईल अद्यावत करणे यामध्ये शाळेच्या मुख्याध्यापकांची व लिपिकाची माहिती अद्यावत करावी. विद्यार्थ्यांचे प्रोफाइल अद्यावत करणे यामध्ये विद्यार्थ्याची वैयक्तिक व शैक्षणिक माहिती अद्यावत करावी. तसेच योजनेची निवड करणे यामध्ये संबंधित विद्यार्थी ज्या योजनेसाठी पात्र आहे, त्या योजनेकरीता अर्ज नोंदणी करणे.पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज महाडीबीटी प्रणालीमध्ये तात्काळ नोंदणी करण्याकरीता सुचना प्राप्त झाल्या असून सदर काम तातडीने पूर्ण करावे. याबाबत काही अडचणी असल्यास जिल्हा समाजकल्याण कार्यालय,जिल्हा परिषद,चंद्रपूर कार्यालयातील ०७१७२-२५५९३३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा अथवा कार्यालयात प्रत्यक्ष भेट देवून अडचणी दूर कराव्यात, असे जिल्हा समाजकल्याण अधिकारी सुरेश पेंदाम यांनी कळविले आहे.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शिवजयंती साजरी

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांचा 'दांडपट्टा' राज्यशस्त्र म्हणून घोषित

## सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांची आग्रा किल्ल्यामधून घोषणा

**आग्रा । प्रतिनिधी**

ज्या किल्ल्यावरून क्रूर, अत्याचारी, जुलमी औरंगजेबाने छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्याचे स्वप्न उधळून टाकण्याचा अयशस्वी प्रयत्न केला, त्याच आग्रा येथील किल्ल्याच्या दिवाण-ए-खासमधून महाराजांच्या आणि मावळ्यांच्या पराक्रमाचे प्रतिक असलेला दांडपट्टा 'राज्यशस्त्र ' म्हणून घोषित करण्यात आला. राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी ही घोषणा करताना अभिमानाने उर भरून येत असल्याची भावना व्यक्त केली.

आग्रा येथील किल्ल्यामध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज की जय', 'हर हर महादेव'चा जयघोष करीत अतिशय दिमाखात शिवजयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री एस. पी. बघेल, खासदार, श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले, दिग्दर्शक प्रवीण तरडे, अभिनेते मंगेश देसाई, सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, विनोद पाटील, विद्याधर पवार,आस्तिक पांडे, गायक नितीन सरकटे आदी मान्यवर उपस्थित होते.

छत्रपती शिवराय आणि त्यांच्या मावळ्यांच्या पराक्रमाचा गौरव करण्यासाठी दांडपट्टा या शस्त्राला 'राज्यशस्त्र' म्हणून मान्यता देण्यात येत असल्याचे ना.मुनगंटीवार यांनी सांगितले. यावेळी दांडपट्टा पूजनही करण्यात आले. ना. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराज रयतेचे राज्य स्थापन करण्यासाठी आयुष्यभर जगले. त्यांच्या जयंतीचा उत्सव साजरा करताना आपण केवळ स्मरण करत नाही, तर भूतकाळातील शौर्यामधून वर्तमानात गौरवशाली भविष्य घडविण्याची ऊर्जा देखील प्राप्त करतो. महाराजांचा विचार घेऊन सर्व विचार, पक्ष, जाती-धर्माच्या लोकांनी रयतेचे राज्य निर्माण करण्याचा संकल्प करायला हवा. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावातच हजारो कोटी सूर्यांची ऊर्जा आहे. त्यामुळेच आपल्याकडे महाराजांच्या कथा लहान मुलांना सांगितल्या जातात, पाश्चिमात्य देशांप्रमाणे स्पायडरमॅन किंवा सुपरमॅन सारख्या काल्पनिक पात्रांच्या कथा सांगितल्या जात नाहीत.' आग्रा येथील किल्ल्याच्या भिंतींना बोलता आले असते तर त्यांनी देखील 'जय भवानी जय शिवाजी' असा जयघोष केला असता, असेही ना. मुनगंटीवार म्हणाले.अशा जयंती सोहळ्यांमधून शिवाजी महाराजांप्रमाणेच पराक्रम गाजवण्याची प्रेरणा आपल्याला मिळते असे सांगत केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री बघेल यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. खासदार उदयनराजे भोसले यांनी महाराज फक्त राज्यापुरता मर्यादित नव्हते तर ते देशाचे नेतृत्व होते. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे राजधानी दिल्लीमध्ये राष्ट्रीय




स्मारक व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. छत्रपती संभाजीनगरसह संपूर्ण भारतातून शिवभक्त या शिवजयंतीसाठी आग्र्यात दाखल झाले होते. आग्रा किल्ल्याबाहेर देखील हजारो शिवभक्तांनी हा सोहळा एलईडी स्क्रीनवर लाईव्ह पाहिला. अजिंक्य देवगिरी फाउंडेशन आणि सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. सरकटे बंधूंनी महाराष्ट्र गीत, छत्रपती शिवाजी महाराज गीत सादर केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आग्रा पराक्रमावर लेझर शो, सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाला. 'महाराष्ट्र राज्याचे चलन' या कॉफी टेबल पुस्तकाचे प्रकाशन यावेळी झाले. अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनोद पाटील यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

ज्या आग्रा किल्ल्यात छत्रपती शिवाजी महाराज यांचा स्वाभिमान डिवचला गेला त्याच आग्रा किल्ल्यात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती थाटामाटात साजरी होणे हा रोमांचकारी क्षण असल्याची भावना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. आग्रा किल्ल्यात दरवर्षी शिवजयंती साजरी होईल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. आयोजनाबद्दल अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनोद पाटील यांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आभार मानले.

छत्रपती शिवरायांचा इतिहास नव्या पिढीसमोर मांडण्यासाठी 'ज्योतिर्लिंग सर्किट'च्या धर्तीवर 'स्वराज्य सर्किट'ची निर्मिती करण्यात येणार असल्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. स्वराज्य सर्किटची निर्मिती करावी अशी मागणी खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांनी याच शिवजयंती सोहळ्यात बोलताना व्यक्त केली होती. त्याला मुख्यमंत्र्यांनी लगेच प्रतिसाद देत, गडकिल्ल्यांचे संवर्धन आणि जतन करण्याची ग्वाही दिली.

मराठा शस्त्रांमध्ये ढाल-तलवार, पट्टा, भाला, कट्यार, वाघनखे, धनुष्यबाण, ठासणीच्या बंदुका व तोफा यांचा समावेश होता. या शस्त्रांमध्ये समावेश असलेला पट्टा म्हणजेच सर्वसाधारण भाषेत ज्याला दांडपट्टा असे म्हटले जाते ते एक वैशिष्ट्यपूर्ण शस्त्र आहे. सरळ लांब दुधारी पाते व त्यास पकडण्यासाठी असलेला खोळबा म्हणजे संपूर्ण कोपरापर्यंतचा हात धातूच्या आच्छादनाने झाकला जाईल, अशी मुठ असणारे शस्त्र म्हणजे पट्टा होय, असा उल्लेख राज्य शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने जाहीर केलेल्या शासन निर्णयात आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या ३५०व्या वर्षानिमित्त ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये दांडपट्ट्याला राज्य शस्त्र घोषित करणे हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. 'छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या ३५०व्या वर्षाचे औचित्य साधून छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज तसेच मावळ्यांनी लढायांमध्ये वापरलेला पट्टा अर्थात दांडपट्टा महाराष्ट्राच्या चिरंतन स्मृतींमध्ये राहावा, यासाठी या शस्त्राला 'राज्य शस्त्र' म्हणून घोषित करण्यात येत आहे,' असे निर्णयात नमूद आहे. शासन निर्णयात दांडपट्ट्याचे ऐतिसाहिक महत्त्व व वापर दोन्हींचा सविस्तर उल्लेख करण्यात आला आहे.

# नगरपरिषद चिमूर प्रशासनाच्या विरोधात काग येथे धरणे आंदोलन

## डॉ.सतिश वारजूकर यांनी आंदोलन स्थळाला दिली भेट

**चिमूर । प्रतिनिधी**



नगरपरिषद चिमूर अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्रमांक १० मौजा काग येथील विविध समस्या संदर्भात प्रशासनाला अनेकदा निवेदन दिले. परंतु कुठल्याही प्रकारच्या समस्या मार्गी लागल्या नसल्याने दिनांक १९ फेब्रुवारी २०२४ पासून रोखठोक प्रहार कामगार संघटना चिमुर तालुकाप्रमुख अशिद मेश्राम व गावकऱ्यांनी खालील मागण्यासह धरणे आंदोलनाला बसले आहेत.

प्र.क्र.१० मौजा काग येथे स्मशानभूमीचे शेड व स्मशानभूमीकडे येजा करण्याकरिता रस्ता उपलब्ध करून देणे. पंतप्रधान घरकुल आवास योजनेची उर्वरित दोन टप्प्याची रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात कधी जमा होईल. नाल्यांचा गाळ उपसून किटकनाशकाची फवारणी करणे. अजाबराव नैताम, सुरेश परचाके, यांच्या घरासमोरील नालीच्या दूषित पाण्याचा मार्ग बंद पडल्याने नवीन पुलियाचे बांधका करणे.प्र.क्र. १० काग येथे नगर परिषद अंतर्गत येणाऱ्या विद्युत पोल ची तारयंत्रणा पूर्णतः खाली झुकलेली असून विद्युत तारेला बळ देणे. महादेव भोपे, अरूण वाभिटकार, पुरूषोत्तम मत्ते, यांच्या घरासमोर दुषित पाण्याची गंगा वाहत असते यासाठी नवीन नालीचे बांधकाम करणे. चिमूर येथे दर शुक्रवार ला आठवळी बाजारातून मोठ मोठी वाहन येजा करतात यावर प्रशासन बंदी कधी घालणार. प्र.क्र.१० मौजा काग येथे पाणी पिण्याच्या नवीन टाकीचे बांधकाम कधी पासून सुरू होणार आहे. प्र.क्र.१० काग येथील बालाजी राणे, अंबादास मेश्राम, हरिदास गुळधे, यांच्या घरासमोर विद्युत पोल गाडून लाईट ची व्यवस्था करण्यात यावी. प्र.क्र.१० आबादी प्लाट नवीन वस्तीतील नालीचे बांधकाम कधी पासून सुरू होणार.उमा नदी पात्रातील कोल्हापूरी बंधारा फुटल्याने येजा करण्यासाठी खूप अरथळा निर्माण होत. असून संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे. अमोल धोंगडे यांच्या घरासमोरील नवीन पुलियाचे बांधकाम करणे. या धरणे आंदोलनाला आज राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबोसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश तथा समन्वयक चिमूर विधानसभा डॉ. सतिश वारजुकर यांनी भेट दिली व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या यावेळी चिमूर विधानसभा युवक कांग्रेस अध्यक्ष रोशन ढोक, माजी नगरसेवक नितीन कटारे, युवा कार्यकर्ते श्रीकांत गेडाम,आशिद मेश्राम,नंदकिशोर मसराम, बाबा पाटील, मंगेश धोंगडे, रामाजी मसराम,मारोती रामटेके व गावकरी उपस्थित होते.

# पूर्व विदर्भ पदाधिकाऱ्यांचे रामटेक येथे शिबीर, पूर्व विदर्भ संपर्क नेते आमदार भास्कर जाधव यांची प्रमुख उपस्थिती

## जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात सर्व पदाधिकारी होणार शिबिरासाठी रवाना

**वरोरा । प्रतिनिधी**



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने रामटेक येथे पूर्व विदर्भ संपर्क नेते आमदार भास्कर जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २३ फेब्रुवारी, शुक्रवारला पूर्व विदर्भातील पदाधिकाऱ्यांची शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरासाठी जिल्हासंपर्क प्रमुख प्रशांत कदम , वरोरा - भद्रावती विधानसभा प्रमुख रितेश रहाटे यांच्या मार्गदर्शनात जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात वरोरा - भद्रावती विधानसभा क्षेत्रातील सर्व शिवसेना पदाधिकारी रवाना होणार आहे.आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांची विधानसभेत जोरदार तयारी सुरु आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने शिवसेना नेते तथा पूर्व विदर्भ नेते आमदार भास्कर जाधव यांच्या नेतृत्वामध्ये होणाऱ्या रामटेक येथील शिबिरात दिनांक २३ जानेवारी, शुक्रवारला सकाळी ९ वाजताच्या दरम्यान शिवसेना पदाधिकाऱ्यांची नोंदणी करण्यात येणार आहे. यानंतर १० वाजता पहिले सत्र सुरु करण्यात येणार असून यामध्ये दीपप्रज्वलन आणि प्रास्ताविक भाषणे होणार आहे. ११.३० ते १२ वाजता सहकारातून संघटन या विषयावर सहकार तज्ञ् प्रदीपकुमार खोपडे मार्गदर्शन करणार आहे. १२ ते १ वाजता मोदी सरकार शेतकऱ्यांचे शत्रू या विषयावर शेतकरी आंदोलक आणि जेष्ठ विचारवंत चंद्रकांत वानखेडे मार्गदर्शन करणार आहे. यानंतर दुपारी २ वाजता दुसरे सत्र सुरु होणार असून यामध्ये प्रास्ताविक भाषणे व २.३० वाजता निवडणूक विजयाचे तंत्र आणि मंत्र या पुणे येथील विषयावर निवडणूक रणनीती तज्ञ् वैभव वाघ मार्गदर्शन करणार आहे. यानंतर ३.३० वाजता पदाधिकारी मुक्त संवाद होणार आहे. सायंकाळी ४.३० वाजता पूर्व विदर्भ संपर्क नेते आमदार भास्कर जाधव पदाधिकाऱ्यांशी संवाद साधून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आहे. जिल्हासंपर्क प्रमुख प्रशांत कदम आणि वरोरा - भद्रावती विधानसभा संपर्क प्रमुख रितेश राहटे यांच्या मार्गदर्शनात व जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात सर्व शिवसेना पदाधिकारी रामटेक येथील शिबिरात रवाना होणार असल्याची माहिती शिवसेना जिल्हा कार्यालयाच्या वतीने प्रसिद्धी पत्रकांच्या माध्यमातून दिली आहे.

# तुमगांव येथे शिवजयंती उत्सव निमित्याने भव्य रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



**तुमगाव । प्रतिनिधी**

शिवजयंती निमित्त शिवछत्रपति युवा प्रतिष्ठान द्वारा आयोजित भव्य रक्तदान शिबिर दिनांक १८ फेब्रुवारी ला संपन्न झाले, या शिबिरात ४० रक्तदात्यांनी रक्तदानाचे कर्तव्य बजावले. व सोबतच गावातील युवा, ज्येष्ठ,महिला पुरुष यांची आरोग्य तपासणी सुद्धा केली.

या शिबिराला प्रमुख पाहुणे म्हणून रमेश राजूरकर भाजपा विधानसभा प्रमुख वरोरा भद्रावती, अहेतेशाम अली माजी अध्यक्ष न. प.वरोरा, डॉ. विजय देवतळे. सभापती कृ. उ.बाजार. समिती,वरोरा यांनी उपस्थित राहून गावकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी गावातील नागरिक व महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्तदान शिबिरात सहभागी झालेल्यांना शिवछत्रपती युवा प्रतिष्ठान तर्फे भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला म्हणून शिवछत्रपती युवा प्रतिष्ठान, तुमगांव चे अध्यक्ष आकाश मेश्राम, उपाध्यक्ष आशिष भुते व सचिव यश काकडे यांनी सर्वाचे आभार मानले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# हंसराज अहीर यांच्या मार्गदर्शनात सिध्दबली इस्पातमधील प्रलंबित प्रश्नी आढावा बैठक



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांनी सिध्दबली इस्पात प्रकल्पातील विविध प्रश्न, समस्या, कामगारांच्या अडचणी, प्रकल्पात होणारे अपघात व अन्य महत्वपुर्ण विषयांवर जिल्हा नियोजन भवन येथे आढावा बैठक घेतली.

दि. २० फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी विनय गौडा, निवासी जिल्हाधिकारी संजय पवार, जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, पुनर्वसन अधिकारी अतूल जटाळे व अन्य विभाग प्रमुखांच्या उपस्थितीमध्ये पार पडलेल्या या बैठकीत हंसराज अहीर यांनी सिध्दबली कंपनीशी निगडीत अनेक विषयांचा आढावा घेतला. कंपनीतील विविध बाबींचा तपास करण्यासाठी समितीचे गठण झाले असतांनाही कार्यवाही का होत नाही अशी विचारणा केली.कामगारांना योग्य सोयीसुविधा पुरवल्या जातात काय ? त्यांच्या सुरक्षिततेची निगा राखली जाते काय ? त्यांच्या अडचणी काय ? या व अन्य समस्यांच्या निराकरणासाठी तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली समिती असतांनाही ती आपली जबाबदारी गांभिर्याने पार पाडतांना दिसत नाही असेही अहीर म्हणाले. या कंपनीच्या दुर्लक्षित धोरणामुळे ४ परप्रांतिय कामगारांचा अपघाती मृत्यू झाला असल्याने या प्रकरणाची सखोल चौकशी करून कंपनी प्रबंधनाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात यावा अशी सुचना एनसीबीसी अध्यक्षांनी जिल्हा पोलिस अधीक्षकांना केली. या कंपनीमध्ये कामगारांना कोणत्याही सोयी-सुविधा दिल्या जात नाही याची गांभीर्याने दखल घेत कामगारांना सोयी-सुविधा पुरविण्याच्या सुचना केल्या. सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयाने यापुर्वी कार्यरत कामगारांची कागदपत्र तपासणी करावी. एकुण ८९ कामगारांपैकी २२ कामगार ५० वर्षांच्या आत असल्याची माहिती कंपनी प्रबंधनाव्दारा देण्यात आली.कामगार कार्यालयाने वस्तुस्थिती तपासून सर्व ८९ कामगारांना अंतिम देय राशी देण्यात आल्याबाबत शहानिशा करावी तसेच कंपनी बंद झाल्यापासून पूर्ववत सुरु होईपर्यंतचा अंतिम राशी किती देण्यात आली किंवा नाही याबाबतचा संपूर्ण अहवाल १० दिवसात जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्याचे निर्देश हंसराज अहीर यांनी या आढावा बैठकीत दिले. या बैठकीला जिल्हाधिकारी, निवासी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधिक्षक, माजी आमदार संजय धोटे, खुशाल बोंडे, तहसीलदार, कामगार अधिकारी, कंपनीचे गुप्ता, हेमराज देशमुख व अन्य अधिकारी, ॲड. प्रशांत घरोटे व कामगार बांधव उपस्थित होते.

# अनधिकृत खुले बियाणे जप्तीची कारवाई

## तालुका कृषी अधिकारी यांनी टाकली धाड



**मूल । प्रतिनिधी**

मूल तालुक्यातील चांदापूर येथे गुणनियंत्रण पथकाने गुप्त माहितीच्या आधारे रविकुमार गोटेपट्टी यांचे शेतात तपासणी केली असता मिरची व कापूस लागवड केलेल्या शेतात असलेल्या स्लॅबच्या घराच्या बाजूला उभ्या केलेल्या महिंद्रा ट्रॅक्टर मध्ये दहा पोते खुले अनधिकृत एच टी बी टी कापूस बियाणे आढळून आले. बियाण्याचे एकूण वजन पाच क्विंटल आहे.

सदर बियाण्याची किंमत ८ लाख ४८ हजार इतकी,ट्रॅक्टर व ट्रॉली सह १३ लाख ४८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.सदर मुद्देमाल पोलीस स्टेशन मुल येथे जमा करून एफ आय आर दर्ज करण्याची कार्यवाही सुरू आहे.सदर कार्यवाही जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,चंद्रपूर शंकरराव तोटावार यांचे मार्गदर्शनाखाली वरील कारवाई करण्यात आली.या कारवाईच्या वेळी वीरेंद्र राजपूत कृषी विकास अधिकारी,चंद्रपूर प्रशांत कासराळे तालुका कृषी अधिकारी मुल लंकेश कटरे मोहीम अधिकारी,चंद्रपूर श्रावण बोडे जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक चंद्रपूर किशोर चौधरी कृषी अधिकारी पंचायत समिती मुल,सुनील कारडवार कृषी अधिकारी पंचायत समिती मुल,प्रकाश पराते कृषी पर्यवेक्षक,मूल विनोद निमगडे,कविता सातपुते कृषी सहायक मुल आणि चमू उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .